दिनांक :   .१२.२०१९

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : नागरिकत्व सुधारण विधेयकाच्या विरोधात आंदोलन करून देशाची अखंडता आणि शांतता भंग करणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई करण्याविषयी....**

महोदय,

नुकतेच केंद्र सरकारने पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान यांसह अन्य देशांतून भारतात आलेल्या हिंदु, शीख, बौद्ध, जैन, पारसी धर्मीय शरणार्थींना भारताचे नागरिकत्व देणारे 'नागरिकत्व सुधारणा विधेयक' संमत केले. सरकारने लोकशाही मार्गाने आणि राज्यघटनेच्या अधिकारात अत्यंत स्तुत्य असा निर्णय घेतला आहे. यासाठी सर्वप्रथम हिंदु जनजागृती समिती मोदी सरकारच्या या निर्णयाचे समर्थन करत सरकारचे अभिनंदनही करते. सरकारच्या या निर्णयामुळे विदेशांतील अल्पसंख्याक हिंदूंवर झालेल्या अत्याचारामुळे निर्वासित होऊन भारतात आलेल्या पीडीत हिंदूंना न्याय मिळणार आहे. त्यांना भारताचे नागरिकत्व मिळण्यातील अडथळे दूर होणार आहेत.

सरकारने घेतलेला हा निर्णय म्हणजे देशभरातील काही धर्मांध आणि कम्युनिस्ट संघटना, तसेच देशविघातक कारवाया करणाऱ्यांना रुचलेला नाही. त्यामुळेच त्यांनी देहली, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल येथे हिंसक आंदोलन चालू केली आहेत. यामध्ये सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी करत आहेत आणि पोलिसांवरही आक्रमण करत आहेत. यामध्ये काही पोलीस गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अतीदक्षता विभागात उपचार चालू आहेत. समाजद्रोही आंदोलकांकडून करण्यात येणारे हिंसक आंदोलन आणि त्यातून होत असलेली हानी ही निषेधार्ह आहे.

**※ तरी या संदर्भात आम्ही लक्षात आणून देऊ इच्छितो की...**

१. देहली येथे जामिया मिलिया इस्लामिया विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून ३ दिवस आंदोलन चालू असतांना १५ डिसेंबरला त्यांनी हिंसाचार केला. यात काही बसगाड्या आणि पोलिसांची वाहने जाळली. या वेळी ६ पोलीस, २ अग्नीशमन दलाचे कर्मचारी आणि अन्य असे जवळपास १०० जण घायाळ झाले. या वेळी विश्वविद्यालयाच्या आवारातून पोलिसांवरही दगडफेक करण्यात आली.

२. लखनौ येथील नदवा महाविद्यालयामध्ये १६ डिसेंबरला या कायद्याला विरोध करतांना समाजकंटक विद्यार्थ्यांनी पोलिसांवर दगड, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या आणि चपला फेकल्या.

३. आम आदमी पक्षाचे देहलीतील आमदार अमानतुल्लाह खान यांनी या कायद्याच्या विरोधात भडकाऊ विधाने केली.

४. या कायद्याच्या विरोधात काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रविष्ट केली. त्यावर सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी हिंसाचार करणाऱ्यांना जे सुनावले, ते अतिशय महत्त्वाचे आहे. सरन्यायाधीश म्हणाले की, हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. सार्वजनिक संपत्तीची कोणालाही हानी करता येणार नाही. आंदोलनासाठी विद्यार्थ्यांना कायदा हातात घेता येणार नाही. आम्ही शांततेने विरोध करणाऱ्यांच्या विरोधात नाही. तुम्ही विद्यार्थी आहात; म्हणून तुम्हाला हिंसाचार करण्याचा अधिकार मिळत नाही. आम्ही तुमचे अवश्य ऐकू, पण प्रथम हिंसाचार थांबवा. हिंसाचार थांबला नाही आणि सरकारी संपत्तीची हानी चालू राहिली, तर सुनावणी करण्यात येणार नाही.

५. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंड येथील एका प्रचारसभेत म्हटले की, देशात जिथे कुठे हिंसाचार चालू आहे, तो राजकीय प्रेरित आणि पूर्वनियोजितच आहे. हिंसाचार कोण करत आहे ?, ते कपड्यांवरूनच कळते. यावरूनच हिंसाचार कोण घडवून आणत आहे ? आणि कोण देशाची अखंडता भेदू पाहत आहे, हेच स्पष्ट होते.

६. अलिगड मुस्लिम विद्यापिठात झालेल्या आंदोलनाच्या वेळी आंदोलक समाजकंटकांनी ‘हिंदुत्व की कब्र खुदेगी, एएमयू की धर्तीपर’, ‘सावरकर की क्रब खुदेगी, एएमयू की धर्तीपर’, ‘बीजेपी की कब्र खुदेगी, एएमयू की धर्तीपर’ आदी घोषणा दिल्या. यातून या विद्यार्थ्यांना नागरिकता कायद्याशी काही देणे घेणे नसून यांतून त्यांचा हिंदुत्व आणि स्वा. सावरकर यांप्रती असलेला द्वेष दिसून येतो. यातून या आंदोलकांचा खरा चेहरा समोर आला आहे.

जे समाजकंटक या कायद्याचा विरोध करत हिंसाचार घडवून आणत आहेत, ते घटनाद्रोही आणि लोकशाहीचे विरोधकच आहेत. अशांवर सरकारने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, समाजकंटकांकडून करण्यात आलेला हिंसाचार सुनियोजित होता. यामागे देशविरोधी आंतरराष्ट्रीय षड्‌यंत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही. **त्यामुळे आम्ही पुढील मागण्या करत आहोत .....**

१. विश्वविद्यालयाच्या आवारात एवढ्या मोठ्या प्रमाणात दगडफेक करण्यासाठी लागणारे दगड आणि जाळपोळ करण्यासाठी लागणारे इंधन कुठून आले ?, या षड्‌यंत्रामागे कोण आहे ?, याची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई करावी.

२. या हिंसाचारामागे सिमी किंवा पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, तसेच जिहादी आतंकवादी संघटना यांपैकी कोणाचा हात नाही ना ?, याचा तपास करावा.

३. ज्या समाजकंटकांनी पोलिसांवर दगडफेक केली, जाळपोळ केली, कायदा हातात घेत सार्वजनिक संपत्तीची हानी केली, त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करत शिक्षा करण्यात यावी.

४. जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, अलीगड मुस्लिम विद्यापीठ, देहली विश्वविद्यालय आदी विद्यापिठांतील ज्या विद्यार्थ्यांनी या हिंसाचारात सहभाग घेतला, त्यांना तत्काळ विद्यापीठातून काढून टाकावे.

५. विद्यापिठांतील विद्यार्थ्यांना विद्यापिठांत कोणत्याही प्रकारचे राजकीय, धार्मिक आणि शासनविरोधी विषयांवर आंदोलन करण्यास बंदी आणावी, तरीही असे होत राहिल्यास अशा विद्यापिठांवरही बंदी आणून विद्यापिठांवर वचक बसवावा.

६. अलिगड मुस्लिम विद्यापिठात हिंदुत्वाच्या विरोधात विषारी घोषणा देऊन समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी.

**आपला विश्वासू,**

स
.
प
क
,